महाज्योती
— ज्ञानदीप सततेला —

महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022
दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/2354/2023 दिनांक -02/11/2023

## -:सुधारीत तपशील:-

**महाज्योती मार्फत "महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) मुख्य परीक्षा -2022 उत्तीर्ण उमेदवारांसाठी व्यक्तिमत्व चाचणी/ मुलाखतीकरीता अर्थ सहाय्य योजना"**

महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) मुख्य परीक्षा-2022 उत्तीर्ण (दि.11/10/2023 रोजी MPSC ने जाहीर केलेल्या निकालाप्रमाणे) उमेदवारांना एकरकमी रु.10,000/- अर्थ सहाय्य प्रदान करण्यासाठी महाज्योती तर्फे ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

### अ. योजनेच्या लाभासाठी पात्रता:

1. उमेदवार हा इतर मागासवर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्ग यापैकी असावा.
2. उमेदवार हा नॉन-क्रिमिलेअर उत्पन्न गटातील असावा.
3. उमेदवार हा महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) मुख्य परीक्षा-2022 उत्तीर्ण केलेली असावी तसेच व्यक्तिमत्व चाचणीसाठी पात्र असावा.

### ब. अर्ज करण्यासाठी आवश्यक वैयक्तिक कागदपत्रे:

1. आधार कार्ड
2. जातीचा प्रमाणपत्र
3. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र
4. मुख्य परीक्षेचे प्रवेश पत्र
5. मुख्य परीक्षेची गुणपत्रिका/ निकाल (MPSC- मुख्य परीक्षेच्या निकालाचे विशिष्ठ पृष्ट ज्यावर उमेदवार उत्तीर्ण झालेले घोषित केले आहे.) (बैठक क्रमांक हायलाईट करणे.)
6. बँक खाते पासबुक चे पहिले पृष्ठ (Account no, Name, IFSC code क्लीअर असावे.)

### क. अर्ज कसा करावा.

1. महाज्योती www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील Application Invited For Financial Assistance Those Who Qualified For MPSC- (State Services Main Examination) Personality/Interview Test-2022" यावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.

2. अर्जासोबत `ब' मध्ये नमूद कागदपत्रे स्वाक्षांकीत करुन स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन अपलोड करावे.

### ड. अटी व शर्ती :

1. अर्ज करण्याचा अंतिम दि.12/11/2023 आहे.
2. सारथी, पुणे या संस्थेकडून अर्थ सहाय्य मिळत आहे किवा त्यासाठी अर्ज केला उमेदवारांना सदर योजनेचा लाभासाठी अर्ज करता येणार नाही.
3. पोस्टाने किंवा ई-मेल व्दारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही. फक्त Online अर्ज ग्राह्य मानन्यात येतील.
4. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती यांचे राहतील.
5. महाज्योती अथवा सारथी या संस्थाकडून चालू आर्थिक वर्षात कोणत्याही प्रकारचा एकरकमी लाभ घेतलेला विद्यार्थी या योजनेकरीता पात्र राहणार नाही.
6. महाज्योती मार्फत MBA-CAT/CMAT-CET, UGC-NET-SET व मिलीटरी भरती प्रशिक्षण, इत्यादी पैकी चालु योजनेचा लाभ घेत असलेले विद्यार्थी या योजनेकरीता पात्र राहणार नाही.
7. बँक खाते फक्त अर्जदाराच्या नावाचेच असावे, नातेवाईक/पालक/मित्र यापैकी आढळल्यास विद्यार्थ्यांचे अर्ज महाज्योती, नागपूर मार्फत रद्द करण्यात येईल.
8. अर्जदाराचे आधार हे बँक खात्याशी लिंक व NPCI असणे आवश्यक आहे.
9. अर्ज भरतांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास केवळ महाज्योतीच्या Call Centre वर पुढील क्रमांकावर संपर्क करावा :
   **0712-2870120/21.**
   **E-mail Id** : mahajyotimpsc21@gmail.com

(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,
(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर